## मार्गदर्शक तत्वे
## (संगणक केंद्रांसाठी)

**महत्वाची टीप:**

अर्ज सर्व महा-ई-सेवा केंद्र व संगणक केंद्रावरुन सुद्धा भरता येतील. त्यासाठी लागणाऱ्या सर्व प्रक्रियेसाठी जास्तीत जास्त रु.१०० (शंभर) आकारणी करण्यात येऊ शकते. कोणत्याही परिस्थितीत यापेक्षा जास्त शुल्क आकारु नये.

**स्कॅन प्रक्रिया:**

1. सर्व प्रथम सर्व आवश्यक कागदपत्रे (Original Document/कागद पत्रांची मूळप्रत) स्कॅनर मधुनच स्कॅन करावा.(मोबाईल, टॅब, कॅमेरा इत्यादी चा वापर केल्यास अर्ज नाकारण्यात येईल)
2. मराठी अर्ज व संबंधित प्रतिज्ञापत्रे या मध्ये काही बदल झाला आहे का हे वेळोवेळी तपासून पाहावे. बदल आढळल्यास अर्ज व प्रतिज्ञापत्रे नवीनच वापरावी.
3. स्कॅनर मधून स्कॅन करताना सर्व कागदपत्रांचा अनुक्रम व्यवस्थित लावावा.

**आवश्यक कागदपत्रे :**

A. उत्पन्नाचा दाखला (स्वतः प्रमाणित केलेले)
B. आधार कार्ड
C. मतदार ओळखपत्र
D. अर्जासोबत सादर करावयाचे **रु. १०० किंवा रु. ५० चे दोन मुद्रांकारावरील** प्रतिज्ञापत्र. (खालील ५ घटकापैकी १ जे लागू असेल ते घटक)
   i) **घटक क्र. १:-** जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपट्ट्यांचा बहुमजली पर्यायाने "आहे तेथेच" पुनर्विकास करणे.
   ii) **घटक क्र.१ (अ):-**झोपडपट्टीत सध्या वास्तव्यास असणारे व घटक क्र. २ अथवा ४ मध्ये लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी नमुना प्रतिज्ञापत्र
   iii) **घटक क्र. २:-** कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिक दृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे/पत आधारित अनुदान योजना.
   iv) **घटक क्र. ३:-** खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे.
   v) **घटक क्र. ४:-** आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान मिळणेस मंजुरी मिळविणे.
E. बँकेचे पासबुक (IFSC कोड असलेला)
F. रेशन कार्ड

**इतर कागदपत्रे :**

G. सिटी सर्वेचे मिळकत प्रमाणपत्र (भूखंडाचा ७/१२ उतारा)
H. BPL प्रमाणपत्र
I. सक्षम प्राधिकरण अधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला
J. जात पडताळणीचे प्रमाणपत्र
K. PAN कार्ड
L. विधवा असल्याचे पुरावे (मृत्यू दाखला)
M. TAX पावती
N. घटस्फोटित/परितकत्या असल्याचे पुरावे
O. अपंगत्वाचे प्रमाणपत्र
P. इतर (विद्युत देयक, पाणीपुरवठा बिल, टेलीफोन बिल, इत्यादी)

4. अर्ज व सर्व कागदपत्रांचे स्कॅनिंग हे जास्तीत जास्त २०० dpi मधेच करावे, २०० dpi पेक्षा जास्त मध्ये करू नये.
5. अर्जदाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे आणि स्वतःचा अलीकडील काळातील कलर पासपोर्ट साईज फोटो स्वतः जवळ असण्याची खात्री करावी. अर्ज भरते वेळी आपल्याला स्वतःचा फोटो अपलोड करावा लागेल आणि या सोबतच कागदपत्रे जास्तीत जास्त २०० dpi फाइल मध्येच स्कॅन करावी. स्कॅन फाइल पी.डी.एफ. (pdf) करून अपलोड करावी लागेल. तसेच स्कॅन केलेल्या प्रत्येक फाइलची साईजही २०० kb पेक्षा जास्त नसावी.
   **A. फोटो :220 x 200 (साईज जास्तीत जास्त 75 KB)**
   **B. स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा :200 x 200 (साईज जास्तीत जास्त 75 KB)**
6. लाभार्थ्यांचे सर्व कागदपत्रे ही व्यवस्थित तपासून स्कॅन करून योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी.

**संगणक केंद्रांनी लाभार्थ्यांचा अर्ज कसा भरावा:**

१. प्रथम लाभार्थ्याचा मराठी अर्ज त्याच्या घटकाप्रमाणे वेबसाईटवरून डाऊनलोड करून प्रिंट द्यावी आणि व्यवस्थित भरण्यास सांगावे अथवा स्वत: भरून घ्यावा.
२. भरलेल्या अर्जा सोबत त्यांचे आवश्यक ती मूळ कागदपत्रे (Original Documents) जोडून घेऊन ती वर नमूद केल्याप्रमाणे स्कॅन करून घ्यावीत.
३. लाभार्थ्याची नोंदणी करून त्याचा युझरनेम व पासवर्ड व्यवस्थित बनवून घ्यावा.
४. त्यानंतर “Fill Form” या बटनावर क्लिक करून लाभार्थाच्या संपूर्ण अर्ज काळजीपूर्वक भरून घ्यावा.
५. लाभार्थ्यांची माहिती ही अचूक भरावी, ऑनलाईन अर्ज भरताना वेळोवेळी कागदपत्रांचा संदर्भ घेऊन व्यवस्थित अर्ज भरावा.
६. सदर अर्ज व संबंधित कागदपत्रे Upload होण्यासाठी २ ते ३ मिनिटे लागू शकतात व ते संबंधित संगणक केंद्रातील Internet Speed वर अवलंबून आहे. हे लक्षात घेऊन एकदा “अर्ज पाठवा”या बटन वर Click केल्यावर संयम बाळगुन कागदपत्रे Upload होईपर्यंत २ ते ३ मिनिट वाट पाहावी.
७. संबंधित कागदपत्रे Upload झाल्यावर प्रत्येक वेळेस अर्ज प्राप्त झाल्याची पोच पावतीची मिळालेली फाईल लाभार्थ्यास प्रिंट करून दयावी.
८. तुमची अर्ज भरण्याची प्रक्रिया येथे पूर्ण होते.

**लाभार्थ्यांचा अर्ज रद्द झाल्यावर काय करावे:**

१. जेव्हा एखाद्या लाभार्थ्याची माहिती चुकीची भरली गेल्यास किंवा आवश्क ती कागदपत्रे न लागल्यास त्याचा अर्ज तपासणीअंती रद्द होऊ शकतो. अर्ज रद्द झाल्याचे कारण हे एस.एम.एस. द्वारे लाभार्थ्यास कळविले जाईल. अशा परिस्थितीत तो अर्ज पुन्हा दुरुस्त करून अपलोड करावा.
२. अर्ज दुरुस्त करताना ‘Fill Form’, बटन दिसेल. त्यावर क्लिक करून अर्ज दुरुस्त करता येईल.
३. दुरुस्त करतेवेळी संपूर्ण मूळ कागदपत्रे व अर्ज व्यवस्थित पाहून अर्ज भरावा व त्यानंतर ‘अर्ज पाठवा’ या बटनावर क्लिक करून अर्ज पुन्हा पाठवावा.